**प्रेसनोट** दिनांक – ०६/०५/२०२२

लोकसेविका सुषमा गंगाधरराव दासरवार, वय–३४ वर्षे, तलाठी (वर्ग–३), तलाठी सजा चंदनसार, विरार, ता.वसई, जि.पालघर हिस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांनी घेतले ताब्यात.

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर |
| २ | गुन्हा नोंद पोलीस ठाणे | विरार पोलीस ठाणे, मिरा–भाईदर–वसई–विरार पोलीस आयुक्तालय |
| ३ | कलम | भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | लोकसेविका श्रीमती सुषमा गंगाधरराव दासरवार, तलाठी (वर्ग–३), तलाठी सजा चंदनसार, विरार, ता.वसई, जि.पालघर |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | ३०००/–रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | ३०००/– रुपये |
| ७ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांची आजी व आज्या मयत झाल्याने ७/१२ वर फेरफार करून वारसदार यांची नावे नोंदविण्यासाठी व आजीचे नाव कमी करण्यासाठी तक्रारदार यांचे वडीलांनी आरोपीत लोकसेविका यांचेकडे अर्ज केला होता. आरोपीत लोकसेविका यांनी फेरफार झालेल्या कागदपत्रांवर सही शिक्का मारून देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे ३०००/– रूपये लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांना आरोपीत लोकसेविका यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक ०६/०५/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयात तक्रार दिली होती..<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०६/०५/२०२२ रोजी आरोपी लोकसेविका यांचेकडे पंचासमक्ष पडताळणी केली असता, आरोपी लोकसेविका यांनी तक्रारदार यांचेकडे सदर कामाचे अनुषंगाने ३०००/–रूपये लाचेची मागणी केली. सदर लाचेची रक्कम लागलीच दिनांक ०६/०५/२०२२ रोजी १२:२८ वाजताचे सुमारास तलाठी कार्यालय, विरार येथे त्यांचे, कार्यालयात तक्रारदार यांचेद्वारे लोकसेविका यांनी स्विकारली असता नमूद आरोपीत लोकसेविका श्रीमती सुषमा गंगाधरराव दासरवार यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहात पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर, पालघर प. ४०१४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– ––
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297
व्हॉट्स ॲप क्र. :– 9923346810

(नवनाथ जगताप)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर

पोलीस उप अधीक्षक

Scanned with CamScanner